**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक २१ मे २०१८**

**फौजदार चावडी पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ३१४/१८भादविसक २७९,३०४(अ),मोवाकाक १३४ अ,ब,१२२/१७७,प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | १९/०५/२०१८ रोजी २१.४५ वा. सोलापूर पुणे हासवे केगांव ब्रीज जवळ,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/०५/२०१८ रोजी १५.०० वा |
| **फिर्यादी** | : | सिध्दलींग सातलिंगआप्पा कलशेट्टी,वय-४९,रा.प्लॉट नं १२५,राजीव नगर अक्कलकोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | कार गाडी क्रं. एमएच/१३/एसी-५६२९ चा चालक |
| **हकिकत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा भाऊ नामे काशिनाथ शिवराया कलशेट्टी वय४३,रा. वेणुगोपाळ नगर कुमठा नाका सोलापूर हा त्याची मोटार सायकल क्रं. एमएच/१३/एच-५४२३वरून कामानिमीत्त पुणे नाका या ठिकाणी जात असताना, नमुद आरोपीतांने त्याच्या ताब्यातील नमुद कार गाडी ही हायगयीने अविचाराने व वेगाने चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलीस पाठीमागुन जोराची धडक देवुन निघुन जावुन फिर्यादीचे भावाच्या डोकीस गंभीर मार लागुन मयत होण्यास कारणीभुत झाला म्हणुन **तपास:- पोसई /देशमाने** |

**एमआयडीसी पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ३०४/१८भादविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | ३०/०६/२०१७ रोजी लग्न झाले पासुन १ महिन्या नंतर ते दिनांक ०१/०५/२०१८ पर्यंत,फिर्यादीचे पतीचे घरी स्वामी विवेकानंद चौक, बाजरपेठ संगमनेर जिल्हा अहमदनगर. |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २०/०५/२०१८ रोजी ०२.३९ वा |
| **फिर्यादी** | : | सौ.अनिता सुमित लोणकर,वय-२४,रा. सध्या-घर नं.४८,शिवानंद नगर किसान नगर चे बाजुला अक्कलकोट रोड सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **आरोपीचे नांव** | **:** | सुमित अरुण लोणकर-पती, २. सौ. शिला लोणकर-सासु, ३. अरुण लोणकर-सासरे, ४. अमित लोणकर-दिर,सर्व रा. सदर |
| **हकिकत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे लग्न झाल्यापासुन फिर्यादीचे पतीचे घरी फिर्यादीला तु पांढ-या पायाची आहेस तु आल्यापासुन घरात शांतता नाही तु कोठेतरी मर असे म्हणुन आ.क्र.२ हिने डोक्याचे केस धरुन ओढले व आ.क्रं..१,३ व ४ यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच फिर्यादीचे आ.क्र.२ हिने फिर्यादीचे गळ्यातील साडेचार तोळ्याचे सोन्याचे गंठण हे आम्ही लग्नात घातले आहे ते काढुन दे असे म्हणुन घेतले तसेच तु माहेरुन आणखीन चार तोळे सोने घेवुन ये म्हणुन शारिरीक व मानसिक त्रास देवुन उपाशिपोटी ठेवून मारहाण व शिवीगाळ केली म्हणुन. **तपास:- पोसई/मस्के.** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | **:** | २६७/१८भादविसक ३२४,३२३,५०४,५०६,प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | **:** | १८/०५/१८ रोजी १९.३० वा चे दरम्यान,फिर्यादीचे राहते घरी |
| **गु. दा. ता.वेळ** | **:** | २०/०५/२०१८ रोजी ००.२० वा |
| **फिर्यादी** | **:** | महासिध्द मलकारी बोरकडे वय-४५ व्यवसाय-ड्रायव्हर रा.अंबिका नगर सोरेगाव वि.रोड सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | **:** | मल्लीकार्जुन पुंडलिक माने रा.अंबिका नगर सोरेगाव वि.रोड सोलापूर. |
| **हकिकत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा मेव्हणा नामे रविंद्र व मल्लीकार्जुन यांच्या दोघांमध्ये मोटारसायकल वापरण्याच्या कारणावरुन भांडण चालु होते त्या वेळी फिर्यादी त्यांना भांडण करु नका ती मोटारसायकल ही माझी आहे तुम्ही दोघेजण कशाला भांडण करता असे म्हणले असता नमुद आरोपी मजकुर हा रागाने निघुन गेला त्यानंतर १९.३० वा.चे सुमारास फिर्यादी घरी झोपलेला असताना कसाल्यातरी लाकडाने फिर्यादीच्या डोक्यात व हाताला मारुन जखमी करुन फिर्यादीची पत्नी ही भांडण सोडविण्याकरीता आली असता तिला देखील लाथाबुक्क्यांनी मारुन जखमी करुन तुम्हा दोघांना खल्लास करतो अशी धमकी देवुन शिवीगाळ करुन पळुन गेला म्हणुन. **तपास:-पोना/८७२/लोहार** |

दिनांक २१/०५/२०१८ रोजी पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर शहर येथे मा. पोलीस आयुक्त श्री. महादेव तांबडे साहेब यांनी,पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी यांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ दिली.

---

____"आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवबंधूमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवून वर्धिष्णू करु, तसेच मानवी जिवित आणि मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्ती प्रतिकार करु."

सोबत - कार्यक्रमाचे फोटो पाठविले आहेत.

---